विद्या विकास मंडळाचे,

## सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,साक्री. (धुळे)

## राष्ट्रीय सेवा योजना एकक २०२३-२०२४

## विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर

## (१०-०२-२०२४ ते १६-०२-२०२४)

### स्थळ- नागाई माता मंदिर परिसर ता. साक्री जि. धुळे

# अहवाल

प्रति,
मा. डॉ. सचिन नांद्रे
संचालक, रा.से.यो. विभाग
क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव.

महोदय ,

"सक्षम युवा समर्थ भारत" या थीमवर आधारित मतदान जनजागृती, शाश्वत विकासात युवकांचे योगदान व ग्रामविकास, पंचप्रण, युवा संवाद, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, मियावाकीं कुलपती घनवन योजना, ऊर्जा बचत काळाची गरज, प्लास्टिक मुक्त अभियान या संकल्पनेवर आधारित विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर दत्तक गाव नागाई माता मंदिर परिसर, नांदवन येथे दि. १०-०२-२०२४ ते १६-०२-२०२४ या दरम्यान झाले. त्याचा अहवाल येथे सादर करीत आहे.

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम अहवाल | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | ०९/०२/२०२४ | दुपारी ०४:०० वाजता नागाई माता मंदिर परिसर, नांदवन येथे शिबीर आगमन व शिबीर तयारी केली सायंकाळी सात दिवसांसाठी सात गट विभागणी केली संध्याकाळी जेवणानंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाले व रात्री १०:०० वाजता दिपमालवन झाली. | |
| ०२ | १०/०२/२०२४ | विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर उद्घाटन समारंभ संम्पन्न झाला. सकाळी पहाटे ०५:०० वाजता जागर झाला. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यानंतर योग, प्राणायम, व्यायाम नंतर चहा, नाश्ता त्यानंतर संपूर्ण नागाई माता मंदिर परिसर स्वच्छता करण्यात आली. आणि त्यानंतर आंघोळ नंतर सकाळी ठीक १०:०० वाजता उद्घाटन समारंभ सुरु झाला. या समारंभाचे अध्यक्ष, मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र आर. अहिरे हे होते. तर उद्घाटक डॉ. सचिन नांद्रे संचालक रासेयो कबचौ उमवि जळगाव हे होते, प्रमुख पाहुणे डॉ. एस ती. बेंद्रे, प्रा. विश्वास भामरे विभागीय प्रमुख रासेयो साक्री तालुका आणि प्रमुख पाहुण्या सौ. चंद्रकला निंबा नवरे, उपसरपंच ग्रामपंचायत कोकले, श्री निंबा नवरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी केले. तर डॉ. सचिन नांद्रे यांनी उद्घाटक म्हणून उद्घाटकीय घोषणा व मनोगत व्यक्त केले. शेवटी अध्यक्षीय मनोगत समारंभाचे अध्यक्ष, मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र आर. अहिरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन गोपाळ पावरा याने केले तर पाहुण्यांचा परिचय महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे यांनी करून दिला. तर आभार प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, डॉ. एस. आर. गोवर्धने, डॉ. डी. एस. चव्हाण, डॉ. धनंजय पाटील, डॉ. दीपक नागराळे, प्रा. विलास पवारा, प्रा. दत्तात्रय वाघमारे, डॉ. अनुप मोरे हेही उपस्थित होते. या शिबिरात एकूण १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.<br>उद्घाटनानंतर दुपारचे जेवण झाले. त्या नंतर NSS गीतमंच घेण्यात<br>आला. दुपारी बौद्धिक चर्चा सत्रात १.) प्रा. विश्वास भामरे यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यक्तिमत्व विकासात महत्व या विषयावर तर डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांचंही पंचप्रण या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर दुपारचा चहा झाला. त्यानंतर विद्यार्थी गट चर्चा "तंत्रज्ञान आणि सद्यस्थिती" या विषयावर झाली. त्यात १. कुवर नीलम दिलीप हिने प्रथम तर २. पवार अक्षय भाईदास याने द्वितीय क्रमांक पटकावला. त्यानंतर सायंकाळी ओळख परेड | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चा गेम खेळला गेला. त्यानंतर रात्रीचे भोजन झाले. भोजनानंतर रात्री सांस्कृतिक कार्यक्रम झाले व रात्री १०:०० वाजता दीप मालवण झाली. | |
| ०३ | ११/०२/२०२४ | पहाटे ०५:०० वाजता जागर झाला. त्यानंतर डॉ. प्रदिप राठोड यांनी  योगा, प्राणायम, व्यायाम घेतला. नंतर चहा, नाश्ता त्यानंतर संपूर्ण नागाई माता मंदिर परिसर स्वच्छ केला. त्यानंतर बंधारा बांधकाम करण्यासाठी सर्व कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक गेले. १०.३० वाजता शिबीर स्थळी परत आलो. त्यानंतर अंघोळ, मग दुपारचे भोजन ११.३० ते १२.३० च्या दरम्यान घेतले. दुपारी १२. ते २. वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना श्री कांतीलाल चव्हाण समन्वयक सिकल सेल अनेमिया, साक्री तालुका जि. धुळे यांनी सिकल सेल अनेमिया या रोगाविषयी माहिती दिली. आणि स्वयंसेवकांच्या एका गटाला या रोगाच्या चाचणीचे प्रशिक्षण देऊन स्वयंसेवकांमार्फत सर्व स्वयंसेवकांचे सिकल सेल अनेमिया चाचणी करून घेतली. २.३० वाजता NSS गीतमंच घेण्यात आला. त्यानंतर दुपारच्या बौद्धिक चर्चा सत्रात १.) डॉ. दादाजी सोनवणे याचे युवा संवाद २.) श्री दिनेश बोरसे यांचे “सर्प माहिती व जनजागृती” या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर चहा, नंतर “मोबाईल वापर योग्य कि अयोग्य” या विषयावर गटचर्चा झाली. त्यात १.) पाटील धीरज नामदेव याने प्रथम तर हिरे पूनम रवींद्र हिने द्वितीय क्रमांक मिळविला.  संध्याकाळी विद्यापीठ आयोजित फिरती विज्ञान प्रदर्शनी शिबिरस्थळी दाखल झाली यावेळी विद्यापीठाच्या संपूर्ण टीमने स्वयंसेवकांना विविध प्रयोगातून कशाप्रकारे आपले भौतिक जग समजून घेता येते याचे प्रात्यक्षिक दिले. नंतर सायंकाळी पासिंग बॉल हा खेळ खेळण्यात आला. नंतर रात्रीचे भोजन, त्यानंतर रात्री सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आणि रात्री १०:०० वाजता दीप मालवण झाली. | |
| ०४ | १२/०२/२०२४ | पहाटे ०५:०० वाजता जागर झाला.त्यानंतर डॉ.प्रदिप राठोड यांनी  योगा, प्राणायम, व्यायाम | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | घेतला. नंतर चहा, नाश्ता त्यानंतर स्वयंसेवक दोन गटात विभागले गेले आणि अर्धे स्वयंसेवक बंधारा बांधकाम करणेकरीता गेले आणि अर्धे स्वयंसेवक मंदिर परिसर, नदीकाठ तसेच रस्ते साफसफाई येथील स्वच्छता त्यांनी केली. त्यानंतर नागपूर आणि कोकले या गावांमध्ये स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गावातील रस्ते, नाल्या आणि मंदिर स्वच्छतेचे काम करण्यात आले. त्यानंतर शिबीर स्थळी परत आलो. त्यानंतर अंघोळ, मग दुपारचे भोजन त्यानंतर विश्रांती त्यानंतर NSS गीतमंच घेण्यात आला. दुपारच्या बौद्धिक चर्चा सत्रात १) डॉ. विनोद भागवत यांचे “जागतिक पक्षी गणना” व २) ऍड. श्री प्रभाकर वाघ यांचे “प्लास्टिक मुक्त भारत” याविषयावर व्याख्यान झाले. त्या नंतर “आजच्या काळातील शिक्षण व त्याचे परिणाम” या विषयावर गटचर्चा झाली. त्यात १. मिर्झा आकिब आरिफ याने प्रथम तर २. सोनावणे जयेश राजेश याने द्वितीय क्रमांक मिळविला. त्यानंतर संगीत खुर्ची हा खेळ सायंकाळी खेळण्यात आला. नंतर रात्रीचे भोजन, प्रबोधन पर सांस्कृतिक कार्यक्रम झाले. ठीक १०:०० वाजेला दीप मालवण झाली. | |
| ०५ | १३/०२/२०२४ | पहाटे ०५:०० वाजता जागर झाला. त्यानंतर डॉ. प्रीतम तोरवणे यांनी योगा, प्राणायम, व्यायाम घेतला. नंतर चहा, नाश्ता त्यानंतर पांझरा नदीवर नदी स्वच्छतेसाठी कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व महिला कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवक गेले व नदीतील घाण, कचरा, कपडे प्लास्टिकच्या वस्तू व पिशव्या सर्व वेचून नदी स्वच्छ करण्यात आली. त्यानंतर स्वयंसेवक आपल्या नियमित बंधारा बांधकाम करण्याच्या ठिकाणी पोहोचले आणि बंधारा बांधकाम केले. त्यानंतर शिबिरस्थळी येऊन आंघोळ आटोपून दुपारचे भोजन, विश्रांती घेतली. २.३० वाजता राष्ट्र भक्ती पर व समाज प्रबोधन पर कवी श्री कैलास चौधरी यांचा "काव्य मैफल" या विषयावर गीतांचा गीतमंच झाला. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नंतर दुपारच्या बौद्धिक चर्चा सत्रात १) डॉ. सुनील बावणेयांचे “मियावाकी कुलपती घनवन योजना” व २) डॉ. प्रा. हर्षल बच्छाव यांचे “मे भारत युवा पोर्टल नोंदणी” या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर चहा, मग “डिजिटल शिक्षण फायदे आणि तोटे” या विषयावर स्वयंसेवक यांची गटचर्चा झाली. त्यात १. राठोड अरुण नटू याने प्रथम तर २. साळुंके दुर्गेश गोकुळ याने द्वितीय क्रमांक मिळविला. नंतर तात्काळ दृश्य गेम खेळण्यात आला. मग रात्रीचे भोजन झाले. नंतर संध्याकाळी “पत्रकार आपलया भेटीला” या कार्यक्रमात पत्रकार मा. श्री सुभाष जगताप, पत्रकार मा. श्री महेंद्र चंदेल यांनी अंधश्रद्धा आणि जादूटोणा विषयक कायदा या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. रात्री समाजप्रबोधन पर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आणि ठीक रात्री १०:०० वाजता दीप मालवण करण्यात आले. | |
| ०६ | १४/०२/२०२४ | पहाटे ०५:०० वाजता जागर झाला. त्यानंतर डॉ. प्रीतम तोरवणे यांनी योगा, प्राणायम, व्यायाम घेतला. नंतर चहा-नाश्ता, त्यानंतर बंधारा खोलीकरणाचे काम आणि पाण्याचा प्रवाह वाढल्यास बंधाऱ्याला नुकसान होऊ नये याकरिता कालवा खोदण्याचे काम कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व महिला कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवक यांनी केले. त्यानंतर शिबीर स्थळी येऊन स्वयंस्वच्छता आटोपली. त्यानंतर दुपारचे भोजन आणि विश्रांती. २. ३० वाजता राष्ट्रभक्तीपर व समाज प्रबोधन पर गीतांचा गीतमंच झाला. नंतर दुपारच्या बौद्धिक चर्चा सत्रात १) डॉ. लहू पवार यांचे मतदार जनजागृती आणि २) प्राचार्य बी. एम. भामरे यांचे “पर्यावरण विषयक आजच्या तरुणांच्या समस्या” या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर चहापान आणि “बालविवाह कायदा" या विषयावर स्वयंसेवक यांची गटचर्चा झाली. त्यात १. दीक्षित आदित्य विनोद हिने प्रथम तर २. बुवा अभय बापू याने द्वितीय क्रमांक मिळविला. नंतर लंगडी हा मैदानी खेळ खेळण्यात आला. मग रात्रीचे भोजन झाले. नंतर रात्रीचे समाजप्रबोधन पर सांस्कृतिक | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आणि ठीक रात्री १०:०० वाजता दीप मालवण करण्यात आले. | |
| ०७ | १५/०२/२०२४ | पहाटे ०५:०० वाजता जागर झाला. त्यानंतर डॉ. प्रीतम तोरवणे यांनी योगा, प्राणायम, व्यायाम घेतला. नंतर चहा, नाश्ता त्यानंतर नागपूर ते कासारे रोडवरील ठिकाणी मागील पाच दिवसापासून करण्यात येणाऱ्या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले आणि बचाऱ्यावर रासेयो आणि महाविद्यालयाचे नाव दगड आणि चुना याचा वापर करून तयार करण्यात आले. बंधारा बांधणे झाल्यानंतर जल्लोष म्हणून स्वयंसेवकांनी रासेयो संलग्नित गीत म्हणत रॅलीचे आयोजन केले. त्यानंतर मंदिर परिसरातील कंपाउंड दुरुस्तीचे काम कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व महिला कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवक यांनी केले. त्यानंतर शिबीर स्थळी येऊन स्वयंस्वच्छता, दुपारचे भोजन, विश्रांती, राष्ट्रभक्ती पर व समाज प्रबोधन पर गीतांचा गीतमंच झाला. नंतर दुपारच्या बौद्धिक चर्चा सत्रात १) डॉ. संजय खोडके यांचे “पाणी व्यवस्थापन”, २) डॉ. प्रकाश साळुंके यांचे “शाश्वत ग्रामविकास” या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर चहापान आणि “प्रसार माध्यमांचा समाजावर होणार परिणाम” या विषयावर स्वयंसेवक गटचर्चा झाली. त्यात १. बोरसे ज्ञानेश्वर भाईदास याने प्रथम तर २. महाले रुमीत वसंत यांना द्वितीय क्रमांक मिळाला. नंतर पासिंग बॉल हा खेळ खेळण्यात आला. मग रात्रीचे भोजन झाले. नंतर रात्रीचे समाजप्रबोधन पर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आणि ठीक रात्री १०:०० वाजता दीप मालवण करण्यात | |
| ०८ | १६/०२/२०२४ | पहाटे ०५:०० वाजता जागर झाला. त्यानंतर डॉ. प्रीतम तोरवणे यांनी योगा, प्राणायम, व्यायाम घेतला. नंतर चहा-नाश्ता त्यानंतर स्वयंस्वच्छता करण्यात आली आणि सांस्कृतिक रॅलीचे आयोजन करण्यात आले यामध्ये सर्व स्वयंसेवकांनी विविध परंपरांचे आणि महापुरुषांचे वेष परिधान करून आणि विविध विषयावर पथसंचलन करून नागपूर आणि कोकले गावातील नागरिकांना एकता, समता | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आणि बंधुता याची जाणीव करून दिली. यामध्ये धार्मिक एकता, बेटी बचाव बेटी पढाव अशा विषयावर गावातील चौकात नाटिकेचे सादरीकरण करण्यात आले. शिबिरस्थळी परत येऊन बौद्धिक चर्चा सत्राला सुरुवात झाली यामध्ये १.) डॉ. सचिन गोवर्धने यांचे “माझी वसुंधरा अभियान” २) डॉ. भूषण अहिरराव यांचे “स्वच्छ भारत अभियान” या विषयांवर व्याख्यान झाले. त्यानंतर दुपारचे भोजन नंतर राष्ट्र भक्ती पर व समाज प्रबोधन पर गीतांचा गीतमंच झाला. आणि ठीक ०२:०० वाजता समारोप समारंभ सुरु झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. क्रांती मोरे हिने केले. समारोप समारंभ अध्यक्ष - डॉ. राजेंद्र आर. अहिरे, समारोप कर्ते - मा. डॉ. डी. एल. तोरवणे (प्रशासकीय अधिकारी, विद्या विकास मंडळ, साक्री), प्रमुख पाहुणे उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, कोकले गावच्या पोलीस पाटील सौ बोरसे महाविद्यालयाचे IQAC Co-ordinator डी. एस. चव्हाण, प्रा. विश्वास भामरे, डॉ. हसीन तडवी हजर होते. या कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली त्यानंतर NSS गीत झाले. मग शिबिरार्थी स्वयंसेवक यांचे प्रातिनिधिक मनोगते झाली. त्यात १) आकिब मिर्झा २) नीलम कुवर ३) पावरा अक्षय ४) साळुंके दुर्गेश ५) वाघ रोहित ६) महाले सोपं ७) हिरे पूनम यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी शिबीर अहवाल वाचन केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे रासेयो विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, डॉ.अनंत पाटील, डॉ. कोकले गावच्या पोलीस पाटील सौ बोरसे, ज्ञानेश्वर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांच्यानंतर मा. डॉ. डी. एल. तोरवणे (प्रशासकीय अधिकारी, विद्या विकास मंडळ, साक्री) यांनी समारोपीय मनोगत व्यक्त केले. शेवटी अध्यक्षीय मनोगत प्राचार्य, डॉ. राजेंद्र आर. अहिरे यांनी व्यक्त केले आणि कार्यक्रमाच्या शेवटी कलपेश पगारे याने आलेल्या पाहुण्यांचे व शिबिरार्थी स्वयंसेवक यांचे, गावातील सरपंच, मुख्याध्यापक, व शिबिरास सहकार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींचे आभार मानले. व शिबीर कार्यक्रम समाप्तीची घोषणा अध्यक्षांच्या पूर्व | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परवानगीने जाहीर केली. विशेष हिवाळी शिबिराची सांगता राष्ट्रगिताने झाली.<br>समारोप समारंभानंतर सर्व शिबिरार्थी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आणण्यात आले. व महाविद्यालयातून विद्यार्थी आपापल्या घरी गेले. | |

**सदर शिबिरात ५० मुले + ७५ मुली = १२५ आणि ०२ पुरुष कार्यक्रम अधिकारी + ०१ महिला कार्यक्रम अधिकारी ०२ NSS प्रतिनिधी (०१ मुलगा + ०१ मुलगी) ०१ शिपाई असे एकूण = १३१ लोकांनी सहभाग घेतला होता.**

| **Category** | **Boys** | **Girls** | **Total** |
|---|---|---|---|
| OBC | 25 | 39 | 64 |
| SC | 03 | 02 | 05 |
| ST | 09 | 26 | 35 |
| GEN. | 13 | 08 | 21 |
| **Total** | 50 | 75 | **125** |

# सि.गो.पाटील महाविद्यालयाचे रासेयो शिबिरास प्रारंभ




साक्री, दि.१२ (प्रतिनिधी)– विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्वपूर्ण असून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्याचे कार्य रासेयो शिबिराच्या माध्यमातून केले जाते असे मत कबचौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सि.गो.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने आयोजित हिवाळी श्रमाणुभव शिबिराचे उद्घाटन दत्तक ग्राम नांदवन अंतर्गत येणाऱ्या श्री नागाई माता मंदिर संस्थान येथे पार पडले. प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एस.टी. बेंद्रे, विभागीय समन्वयक प्रा.विश्वास भामरे, कोकले ग्रामपंचायतीच्या उपसरपंच चंद्रकला निंबा नवरे उपस्थित होते. डॉ.नांद्रे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संधीची माहिती प्रसंगी दिली. डॉ.बेंद्रे यांनी मानवी जीवनामध्ये वैज्ञानिक प्रगती आणि त्याचे फायदे या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.अहिरे यांनी समर्थ भारत घडवायचा असेल तर सक्षम युवा निर्माण झाला पाहिजे असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रदीप राठोड यांनी तर पाहुण्यांचा परिचय महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.ज्योती वाकोडे यांनी करून दिला. संचालन गोपाल किसन पावरा तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा सुरेंद्रसिंग मगर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा.रविंद्र मोरे, गौतम बच्छाव व सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेत–ले. सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी सक्रियपणे सहभागी झाले आहेत.

जाहीर नोटीस
तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था,

सकाळ TODAY

# 'रासेयो'कडून सामाजिक भान निर्माण करण्याचे कार्य

## पाटील महाविद्यालयाचे नांदवनला श्रमसंस्कार शिबिर

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. १३ : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वपूर्ण असून, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्याचे कार्य रासेयो शिबिराच्या माध्यमातून केले जात असल्याचे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे हिवाळी श्रमानुभव शिबिराच्या दत्तकग्राम नांदवनअंतर्गत येणाऱ्या श्री नागाई माता मंदिर संस्थान येथील उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते. डॉ. एस. टी. बेंद्रे,



**नांदवन** : हिवाळी श्रमानुभव शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. सचिन नांद्रे.

विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, कोकलेच्या उपसरपंच चंद्रकला निंबा नवरे आदी उपस्थित होते. डॉ. नांद्रे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संधीची माहिती दिली. डॉ. एस. टी. बेंद्रे यांनी मानवी जीवनामध्ये वैज्ञानिक प्रगती आणि त्याचे फायदे या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अहिरे यांनी समर्थ भारत घडवायचा असेल तर सक्षम युवा निर्माण झाला पाहिजे आणि हे सक्षम युवा निर्मितीचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून केले जाते, असे मत व्यक्त करत सर्व स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी प्रास्ताविक केले. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे यांनी परिचय करून दिला. गोपाल किसन पावरा यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी आभार मानले. प्रा. रवींद्र मोरे, गौतम बच्छाव, स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# सी.गो.पाटील महाविद्यालयातर्फे हिवाळी शिबिरात श्रमदान



**साक्री (अनिल देसले,दै.धुळे दवंडी)**: विद्या विकास मंडळाच्या सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने आयोजित विशेष हिवाळी शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी योगा, ध्यानध्यारणेने करण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवकांनी श्रमदानातून दत्तक गावाजवळील टेकडीवर भुजल संवर्धन करिता चारी खोदल्या. तसेच वनराई बंधाऱ्याचे काम सुरू केले. दुपारी सर्व स्वयंसेवकांची सिकल सेल अनेमीया ची तपासणी करण्यात आली. बौद्धिक सत्रात डॉ. डी. व्ही. सोनवणे जिजामाता महाविद्यालय नंदुरबार यांचे युवा संवाद याविषयावर व्याख्यान झाले. तर दुसरे व्याख्यान श्री दिनेश बोरसे अध्यक्ष जिवरक्षा वन्यजीव संरक्षण संस्था, वाघाडी ता. शिरपूर यांचे सर्प विषयक माहिती आणि जनजागृती या विषयावर व्याख्यान झाले. यामध्ये त्यांनी स्वयंसेवकांना सापाच्या विविध बिनविषारी सौम्यविषारी विषारी जातीविषयी सखोल माहिती दिली. संध्याकाळी श्रद्धा आणि अंधश्रद्धा व प्रथम उपचार कसे करावे. सर्पमित्र दिनेश बोरसे व विकास शिरसाठ यांनी वेवस्तीत माहिती दिली.या विषयावर गटचर्चा झाली. आणि विविध समाज प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे सर्व नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदिप राठोड, सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे जिवरक्षा वन्यजीव संरक्षण संस्थाचे अध्यक्ष दिनेश बोरसे, उपाध्यक्ष विकास शिरसाठ, शेकनाथ महिदे, उर्मीला महिदे, गंगाधर कोळी हें उपस्थित होते.आणि प्रा. रवींद्र मोरे यांनी पाहिले.समस्त शिक्षक उपस्थित होते.

# जेव्हा अंधश्रद्धा माणसाच्या शिक्षणापेक्षा वरचढ ठरते तेव्हा तो मानसिक गुलाम होतो:पत्रकार सुभाष जगताप

**साक्री (अनिल देसले,दै.धुळे दवंडी)**: जेव्हा अंधश्रद्धा माणसाच्या शिक्षणापेक्षा वरचढ ठरते तेव्हा तो मानसिक गुलाम होतो व मानसिक दृष्ट्या कमकुवत होतो व अंधश्रद्धेचा बळी ठरतो असे विचार साक्री येथील सि. गो. पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात आणि जिल्हा प्रधान सचिव जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांनी व्यक्त केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे होते तर व्यासपीठावर कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड प्रा. मगर, पत्रकार महेंद्र चंदेल हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री जगताप पुढे म्हणाले समाजातील अंधश्रद्धेमुळे जादूटोणा, अघोरी प्रथा, नरबळी, भूतबाधा, भानामती, गुप्तधन काढण्याच्या हेतूने अनेकांचे बळी जाणे जातपंचायतीतून एखाद्या व्यक्तीला गावाबाहेर काढणे अथवा विवस्त्र करून धिंड काढणे असे प्रकार होतात त्यासाठी शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत १९८९ पासून जादूटोणा विरोधी कायद्यासाठी अनेक आंदोलने व संघर्ष करून अंधश्रद्धा निर्मूलन,अघोरी प्रथा, नरबळी जादूटोणा प्रतिबंधक, उच्चाटन कायदा २० डिसेंबर २०१३ रोजी मंजूर करून घेतला त्यामुळे समाजातील जीव घेण्या व संधी साधू, बुवा, बाबांवर, व प्रथांवर चाप बसला आहे.समाजातील अंधश्रद्धेमुळे सुशिक्षित लोकही वास्तुदोष, नारायण नागबळी, यासह अनेक विधींचा आश्रय घेतात. खरंतर वास्तुत दोषच नसतो वास्तुत राहणाऱ्या व्यक्तीमध्ये दोष असतो, मंदिरात बसून पेपर सुटत नसतात, त्यासाठी विद्येच्या मंदिरात जिद्द, व चिकाटी ठेवून प्रयत्न करावे लागतात जे नशिबावर अवलंबून असतात ते भित्रे असतात. जे स्वतः इतिहास घडवतात ते धाडसी असतात. श्रद्धा असावी पण श्रद्धेचा विपर्यास नसावा. त्यातूनच अंधश्रद्धा उदयास येते कोणत्याही गोष्टीची शहानिशा, सत्य, असत्य पारखूनच विश्वास ठेवावा, तरुणांनी विवेकी व विज्ञानवादी विचार अंगीकारले पाहिजे दैववादी न राहता कर्मवादी असले पाहिजे अंधश्रद्धेने कमकुवत झालेल्यांचे संधी साधू शोषण करू लागतात त्यातून अमानुष छळ, नरबळीसारखे अघोरी प्रयोग होतात. महिलांचे लैंगिक शोषण ही होते असे सांगत त्यांनी जलप्रदूषण, वायू प्रदूषण तसेच अंगात येणे, जलस्रोत शोधणे, दिव्यदृष्टीतून गर्भधारणा करणे, भूत काढणे, बोट लावून गर्भातील लिंग बदल करणे, असे अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना विज्ञानाची कास धरण्याचा मंत्र दिला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी श्रमदानातून तयार केलेल्या बंधाऱ्याचे कौतुक केले.

सूत्रसंचालन कु. सोनाली शिंदे हीने केले तर आभार कु. चेतना गोस्वामी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे, प्रा. रवींद्र मोरे आणि सर्व स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले.

लोकमत

# विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कारातून साकारला वनराई बंधारा

## सी.गो. पाटील महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा नांदवन येथे समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री :** सी. गो. पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रीक्षेत्र नागाई माता मंदिर परिसर, नांदवन येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात विद्यार्थांनी श्रमदानातून वनराई बंधारा बांधला. विद्यार्थांच्या या कामाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करून या शिबिराचा समारोप करण्यात आला.

शिबिराच्या समारोप समारंभाचे अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, आयक्यूएसी संयोजक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. यानंतर उपस्थित शिक्षक व मान्यवरांनी विद्यार्थांनी तयार केलेल्या वनराई बंधाऱ्याला भेट देऊन पाहणी केली. तसेच असे उपक्रम विद्यार्थ्यांनी आपापल्या गावामध्ये राबविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबिरार्थी विद्यार्थिनी क्रांती मोरे हिने केले, तर आभार कल्पेश पगारे याने मानले. यशस्वीतेसाठी सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे यांनी परिश्रम घेतले.

शिबिराच्या तांत्रिक बाबींचे नियोजन प्रा. रवींद्र मोरे, माजी स्वयंसेवक दिलीप बाचकर आणि शुभम सोनवणे यांनी सांभाळले.



श्रमदान करताना विद्यार्थी, विद्यार्थिनी.

### शिंबिरात रंगले विविध कार्यक्रम

या पाच दिवसीय शिबिरात विविध विषयांवर तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच योगा, प्राणायाम, मतदार जनजागृती, कवी मैफल, भारुड, पोवाडे, लोकगीते आणि सिकल सेल अनेमिया चाचणी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शिबिरादरम्यान तयार केलेल्या सातही गटांतील प्रत्येकी एका विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त करताना शिबिराच्या विविध आठवणींना उजाळा दिला. येथील संस्कारांचा आपल्याला भविष्यात खूप फायदा होणार असल्याचे मत विद्यार्थांनी मांडले.

Hello Dhule
Page No. 3 Feb 20, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# सि.गो. पाटील महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिराचा समारोप




**साक्री:** विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्यावतीने आयोजित विशेष हिवाळी श्रमानुभव शिबिराचा समारोप करण्यात आला.

दि.१० ते १६ फेब्रुवारीदरम्यान श्री क्षेत्र नागाई माता मंदिर परिसर, नांदवन येथे विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे तर अध्यक्ष प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे होते. प्रा.विश्वास भामरे, रासेयो विभागीय समन्वयक साक्री, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण आय क्यू ए सी समन्वयक होते. स्वयंसेवकांनी श्रमदानातून साकारलेल्या वनराई बंधाऱ्याला भेट देऊन मान्यवरांनी कौतुक केले. शिबिराचे सिंहावलोकन कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रदीप राठोड यांनी प्रस्तुत केले. ज्यामध्ये विविध विषय आणि विषयतज्ञाचे व्याख्यान, योगा आणि प्राणायाम, पत्रकार भेट, कवी मैफल, भारुड, पोवाडे, लोकगीते आणि सिकलसेल ॲनिमिया चाचणी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या आठवणींना उजाळा दिला. व्यक्तिमत्व विकासासाठी रासेयोचे योगदान महत्वपूर्ण असते, असे प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे यांनी सांगितले. याप्रसंगी स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. विभागीय समन्वयक प्रा.विश्वास भामरे यांनी शिबीर यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त केले. कोकले गावच्या पोलीस पाटील श्रीमती बोरसे यांनी रासेयो शिबिर समारोपाला उपस्थित राहून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे यांनी स्वयंसेवकांनी नियमित कार्यक्रमांसह श्रमदानातून साकारलेल्या वनराई बंधाऱ्याचे कौतुक केले. सूत्रसंचालन क्रांती मोरे हीने केले तर आभार कल्पेश पगारे याने मानले. यशस्वीतेकारिता सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेंद्रसिंग मगर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.ज्योती वाकोडे यांनी परिश्रम घेतले. तांत्रिक बाबींचे नियोजन प्रा.रवींद्र मोरे, माजी स्वयंसेवक दिलीप बाचकर आणि शुभम सोनवणे यांनी सांभाळले.

Smart Dhule Edition
Feb 21, 2024 Page No. 2
Powered by : eReleGo.com


2024/02/10 10:15
E 74.3 N 21.0
NSS Special Winter Camp 2023-24


विद्या विकास मंडळाचे,
सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, साक्री जि. धुळे
राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
Not Me But You
विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर
2024/02/10 10:17
E 74.3 N 21.0
NSS Special Winter Camp 2023-24


राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर
S.G.PATIL COLLEGE
SAKRI
E 74.3 N 21.0




Latitude: 20.954282
Longitude: 74.291517
Altitude: 365.24±11 m
Accuracy: 12.6 m
Time: 02-11-2024 16:55
Note: NSS Cam बौध्दीक सत्र day-2 (2024)
Powered by NoteCam


S.G.PATIL COLLEGE
SAKRI


NSS Special Winter Camp 2023-24
Nandwan, Indi
2024/02/12 15:31


SGPC-NSS
NSS
Latitude: 20.951781
Longitude: 74.289164
Elevation: 439.07±18 m
Accuracy: 10.5 m
Time: 14-02-2024 11:45
Note: राष्ट्रीय सेवा योजना श्रमानुभव शिबीर
Powered by NoteCam


राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
Not Me But You
विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीर
Latitude: 20.954128
Longitude: 74.291539
Elevation: 435.28±34 m
Accuracy: 14.8 m
Time: 02-16-2024 13:00
Note: NSS Camp day-7 समारोप समारंभ (2024)
Powered by NoteCam